# SLR-AK-160

| Seat No. | |
|---|---|

**Set P**

## B.A. (Semester - IV) (New) (CBCS) Examination Oct/Nov-2019
## Marathi (Paper – V)
## कथा वाङ्‌मय प्रकार व व्यावहारिक मराठी

Day & Date: Monday, 04-11-2019 Max. Marks: 70
Time: 11:30 AM To 02:00 PM

**सूचना :** 1) सर्व प्रश्न अनिवार्य आहेत.
2) उजवीकडील अंक पूर्ण गुण दर्शवितात.

**प्र.1 खालील दिलेले योग्य पर्याय निवडून गाळलेल्या जागा भरा.** **14**

1) आपण माणसात जमा नाही, ही कलाकृती किती साली प्रकाशित झाली.
अ) 1980 ब) 2009
क) 2000 ड) यापैकी नाही

2) जैतुनबी पुढीलपैकी कोणता व्यवसाय करीत होती?
अ) बांगडयांचा ब) शिंप्याचा
क) विणकाम ड) मजुरी

3) बाबलच्या शिक्षणासाठी भिकाऱ्यासारखे पैसे मागून कोणी मदत केली?
अ) धर्मा पाटील ब) गणमालेने
क) आबा पाटील ड) आईने

4) राया बहुलकर याला शाळेत कोणी दाखल केले?
अ) भावाने ब) मुसळे मॅनेजरने
क) नाना बहुलकरांनी ड) यापैकी नाही

5) 'ठराव' कथेतील निवडणुका कशाच्या असतात?
अ) ग्रामपंचायत ब) लोकसभा
क) विधानसभा ड) दुध संघ

6) वळसंग्या काकाच्या गावचे लोक त्याच्या वडिलांना काय म्हणत?
अ) बामण ब) मास्तर
क) वकील ड) यापैकी नाही

7) बुगटया आलुऱ्या हे पात्र कोणत्या कथेतील आहे?
अ) ठराव ब) पाझर
क) सन्नाटा ड) घव

8) सागर इमानदार कोणत्या पत्रकाचे संपादक होते?
अ) प्रहार ब) साहित्य गवार
क) गावकरी ड) प्रभात

9) तिप्याने कोणाची हत्या केली?
अ) वडिलांची ब) बायकोची
क) मित्राची ड) मास्तराची

10) लेखकाच्या गावात घरपती कुणाचं तरी नाव ––– असते.
अ) महादेव ब) विठ्ठल
क) नारायण ड) देवाचे

11) नावच तीन चतुर्थांस कथेत पाटीलकी कोणाच्या घरात असते.

| | |
|---|---|
| अ) तात्या पाटलाच्या | ब) चांभाराच्या |
| क) तुका शिंदयाच्या | ड) सुताराच्या |

12) कमळा सुतारीन कोणत्या कथेतील प्रमुख पात्र आहे.

| | |
|---|---|
| अ) घव | ब) ठराव |
| क) तळ | ड) सन्नाटा |

13) आजी कोणत्या गावाला बाजारात माळवं विकायला पायी जात होती?

| | |
|---|---|
| अ) कोल्हापूर | ब) आजरा |
| क) जयसिंगपूर | ड) गडहिंग्लज |

14) तळ कथेचा नायक कोण आहे?

| | |
|---|---|
| अ) जबाल्या | ब) तुकण्या |
| क) सत्त्या | ड) तिप्या |

**प्र.2 खालीलपैकी कोणत्याही चार प्रश्नांची थोडक्यात उत्तरे लिहा.** **16**

1) 'पाझर' कथेतील जैतूनबीच्या मुलांची माहिती सांगा.
2) बाबलसाठी आबा पाटलांनी कोणत्या प्रकारची मदत केली?
3) 'ठराव' कथेतील दुधसंस्थेची माहिती लिहा.
4) वळसंग्याकाका आपल्या बांधवाकडून कोणती अपेक्षा करतो?
5) गुंडू बामणाच्या दत्तक पुत्राची माहिती लिहा.
6) तिप्याच्या हव्यासाची माहिती सांगा.

**प्र.3 खालीलपैकी कोणत्याही दोन प्रश्नांची उत्तरे लिहा.** **12**

1) छळणारी गोष्ट मधील तात्याची माहिती लिहा.
2) 'तिप्या, मी आणि सैराट श्वापद' या कथेतील तिप्पाण्णा च्या आधारे माणसे काळानुरूप कशी बदलतात हे स्पष्ट करा.
3) कथा म्हणजे काय ते सांगून कथेचे स्वरूप स्पष्ट करा.
4) 'सन्नाटा' कथेतील भटिनीच्या दुःखाची हकीगत लिहा.

**प्र.4 खालीलपैकी कोणत्याही एका प्रश्नाचे उत्तर लिहा.** **14**

सारांश लेखन म्हणजे काय ते सांगून सारांश लेखनाची पद्धत स्पष्ट करा.

**किंवा**

खालील उतारा वाचून त्याचा ⅓ (एकतृतीयांश) सारांश लिहा व योग्य शिर्षक द्या.

कोणत्याही गोष्टीसाठी खूप मेहनत घेणे हा संकेतचा स्वभाव आहे. त्याच्या या कष्टाला यश मिळत गेले सुद्धा; पण त्यामुळे तो शेफारून गेला नाही. कष्टाचे महत्वही विसरला नाही. कष्ट करण्याचे त्याने कधीही सोडले नाही. कुठल्याही कामाला त्याने कधीही नकार दिला नाही. आपल्याजवळ जीनियस नाही. आपण खूप हुशार नाही. याची त्याला खूप जाणीव आहे. ही बुद्धिमत्तेची कमतरता आपण अपार मेहनतीने भरून काढायची आहे. याची स्पष्ट जाणीव त्याला आहे. म्हणून तो इतकी वर्षे संथपणे सतत प्रयत्नाची कास धरून प्रत्येक क्षेत्रात यश मिळवीत राहिला.

**प्र.5** 'आम्ही माणसात जमा नाही' या कथासंग्रहातील 'तळ' या कथेतील 'कल्लवा' चे स्वभाव चित्रण लिहा. **14**